# प्रेसनोट

दि. २०/०२/२०२३

**अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे येथील सहायक आयुक्त (अन्न) यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | साहेब एकनाथराव देसाई, सहायक आयुक्त (अन्न), वर्ग – १,<br>अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये. |
| पडताळणी दिनांक | १७/०२/२०२३ |
| सापळा दिनांक | २०/०२/२०२३ |

ठिकाण :- अन्न व औषध प्रशासन विभाग कार्यालय, औंध, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे कंपनीचे मार्फत लॅक्टोज विक्रीचा परवाना मिळणेकामी अर्ज केला होता. सदरचा अर्ज मंजूर करुन परवाना देणेकरीता अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे येथील लोकसेवक साहेब देसाई यांनी तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे मधील लोकसेवक साहेब देसाई यांनी तक्रारदार यांचेकडे १० हजार रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

पोलीस निरीक्षक भारत साळुंखे, ला.प्र.वि. पुणे हे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

Scanned with CamScanner